आजचा दिनविशेष
१९९३ : किल्लारी भूकंपात सुमारे १०,००० लोकांचा मृत्यू झाला, हजारो लोक बेघर झाले.

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ३० सप्टेंबर २०२५ | अंक २८० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# गोदावरी नदी काठच्या गावाला पडला वेडा अजूनही कायम आहे पुराचा फेरा







दरम्यान माजी आ.अमरसिंह पंडीत, गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडीत, रणवीर पंडीत यांनी गोदाकाठावरील गावांना भेटी देऊन पुरग्रस्त भागाची पाहणी करून आश्वस्त केले आहे नुकसान झालेल्यांना शासन सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगीतले आहे

उमापूरच्या डॉक्टरांची मोफत रुग्नसेवा गोदाकाठ संकटात असताना उमापूरच्या डॉ. वाघमोडे, डॉ. काळे, डॉ. अमोल पवार यांनी संकटात सापडलेल्या परिसरातील पुरग्रस्तांना दहा दिवस मोफत उपचार कण्याचा निर्णय घेतला आहे तर उमापूर येथील त्रिमुर्ती मंगल कार्यालयाचे मालक ज्ञानेश्वरराव आहेर यांनी पुरग्रस्तांना राहण्याची मोफत व्यवस्था केली आहे.

बीड / प्रतिनिधी जायकवाडी धरनातून इतीहासात कधी नव्हे इतका वीसर्ग गोदावरी नदीत सोडण्यात आला यामुळे गोदा काठावरील नागरीकांना सुरक्षीत स्थळी हलवण्याचे कार्य रविवार रोजी सकाळपासूनच सुरु होते, रविवार रोजी रात्री दहा ते पहाटे सहा पर्यंत याभात भयंकर परिस्थिती होती, गेवराई तालुक्यातील बोरगाव, गुंतेगाव, पाथरवाला, गुळज, राक्षसभुवन, पंचाळेश्वर सह आदी गावात नदीचे पात्र सोडून दीड

## १९ वर्षानंतर गोदाकाठाने पुन्हा पाहिले ती काळरात्र

ते दोन किमी अंतरापर्यंत पाणी होते. नागरीकांनीही जिवनावश्यक वस्तू हाताला लागेल ते घरातील वस्तू घेवुन सुरक्षीत स्थळी पोहचवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून झाला यावेळी प्रशासनाची मात्र तारांबळ उडाली आहे यातच गोदापात्रात तीन लाख क्युसेसच्या वर पाणी आल्याने २००६ पेक्षाही भायनक परिस्थिती निर्माण झालेली आहे अख्ख गावचे गाव पाण्यात आहेत, सोमवार सकाळी विसर्ग कमी करण्यात आला होता मात्र सोमवारी दुपारी पुन्हा जायकवाडी धरनात पाण्याची आवक वाढल्याने गोदापात्रातील विसर्गात वाढ करण्यात आल्याने गोदाकाठावरील गावे अजूनही धोक्यातच आहेत.

पैठणच्या जायकवाडी धरणातून गोदावरी नदी पात्रात रविवार रोजी सकाळ पासूनच नाशीक व धरन क्षेत्रात पाऊस झाल्याने रात्री दहा वाजेपर्यंत ३ लाख क्युसेसच्या वर पाणी सोडणे सुरु होते तर सोमवार रोजी सकाळी वीसर्ग कमी झाल्याने याभागातील पुरग्रस्तांना काहीसा समाधान वाटला होता मात्र पुन्हा पाण्याचा विसर्ग वाढल्याने संकटात सापडले आहे.

२००६ ला २ लाख ६७ हजार क्युसेक्स पाण्याचा वीसर्ग गोदावरी नदीत सोडण्यात आल्याने गेवराई तालुक्यातील ३२ गावात पाणी शीरुन नुकसान झाले होते, १९ वर्षानंतर पुन्हा ती परिस्थिती उदभवल्याने नुकसान मोठे झाल्याचे दिसत आहे.

# घाटनांदुर रेल्वे पुलाखालील पाणी साचल्यामुळे नागरिक त्रस्त

(घाटनांदुर) ता.अंबाजोगाई घाटनांदुर गावात पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात झाला असून अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर मंडळामध्ये ८४.३ mm इतकी अतिवृष्टी पावसाची नोंद झाली आहे. रेल्वे पुलाखाली मात्र पाणी साचून रहदारीत अडथळा निर्माण झाला आहे.अनेक वर्षांपूर्वी झालेल्या रेल्वेच्या गलथान कारभारामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी स्थानिक ग्रामस्थांची डोकेदुखी ठरला आहे. पावसाचे पाणी साचल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून,पायी जाणाऱ्या नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. दरवर्षी पावसाळ्यात या पुलाखाली पाणी साचते आणि त्यामुळे नागरिकांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. चारचाकी, दुचाकी वाहने तर अडकून पडतातच, पण शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग, तसेच शेतकरी बांधवांनाही या समस्येमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येऊनही प्रशासनाकडून याकडे गंभीरतेने पाहिले जात नसल्याचे दिसून येते. नागरिकांच्या मते, योग्य निचरा व्यवस्था नसल्यामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी उभा राहिला आहे.

नागरिकांची मागणी आहे की, संबंधित रेल्वे व स्थानिक प्रशासनाने तात्काळ पावले उचलून पुलाखालील



पाणी साचण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा.अन्यथा दरवर्षी नागरिकांना या त्रासातून जावे लागणार आहे.

प्रशासनाने त्वरित दखल घेऊन नागरिकांना या समस्येतून मुक्त करणे गरजेचे आहे,अशी मागणी घाटनांदुर स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने जोर धरू लागली आहे.

# नेकनूरमध्ये अतिवृष्टीमुळे घरात पाणी शिरले; जिल्हा परिषद सदस्य भारत बाप्पा काळे यांनी केली पाहणी



नेकनूर :शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे दर्गा कॉलनी, रुकसान कॉलनी व शहबाज कॉलनी या भागातील नागरिकांचे मोठे हाल झाले आहेत. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. दर्गा कॉलनीतील पठाण अहमद खान व आजीम मीर हुसेन या दोघांच्या घराची भिंत कोसळून मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच मा. जिल्हा परिषद सदस्य भारत बाप्पा काळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच नुकसानग्रस्तांना तात्काळ भरपाई करण्यात यावे, असे आदेशही दिले. व एक महिना पुरेल एवढी किराणा कीट दिली . या वेळी चेअरमन रवींद्र काळे, सय्यद वाजेद अली (गोरे भैया), मतीन खतीब, सुभाष शिंदे.दिव्य वार्ता चे पत्रकार शेख शाकेर व रशीद मामु आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी बाधित कुटुंबांना धीर दिला. मा. जिल्हा परिषद सदस्य भारत बाप्पा काळे यांनी आश्वासन दिले की, “नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाकडून मदत मिळावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. कुठलीही अडचण आली तर आम्ही सोबत आहोत.”

# बीड जिल्हा अतिवृष्टीमुळे शैक्षणिक शुल्क माफ करावे- सज्जाद सय्यद



पाटोदा प्रतिनिधी सध्या बीड जिल्ह्यात अतिवृष्टी अति पाऊस ,पूर परिस्थिती मुळे अधिक नुकसान झाले आहे. व शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे म जुरांचे कामगारांचे पूर परिस्थितीमुळे होणारे हाल आणि वाहून गेलेले घर -संसार, अन्नधान्य व कष्टकरी मजुरांना हाताला काम नसल्याने बीड जिल्हा तसेच जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना पुराचा आणि अतिवृष्टीचे जास्त प्रमाणात नुकसान झाल्याने हदबल असलेला शेतकरी कष्टकरी व कामगार मजुर अत्यंत बिकट संकटात असून सध्या तरी स्वतःच्या मुला- मुलीचे शिक्षणाचा खर्च चालणार कसा हा प्रश्न सर्वात मोठा निर्माण झाला आहे. आणि अशाच परिस्थितीमध्ये जिल्ह्यामध्ये महाविद्यालय मोठ्या प्रमाणात असून विविध अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क जास्त असल्याने तसेच परीक्षा मंडळ व विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क हे अधिकच्या प्रमाणात असल्याने सध्या तरी शासनाने अतिवृष्टी बीड जिल्ह्यामध्ये ज्या तालुक्यांमध्ये जास्तीत -जास्त प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे .त्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सहकारी संस्था संचालक- सय्यद सज्जाद यांनी केली आहे.

# नारायणगडच्या विजयी दसरा मेळाव्याकडे महाराष्ट्राचे लक्ष

## जरांगे पाटील दसरा मेळावा माध्यमातून ओला दुष्काळ,समाजाची संवाद साधणार

कोळगाव । प्रतिनिधि बीड जिल्ह्यातील सर्व जनतेचे श्धदास्थान अन महाराष्ट्र ाची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायणगडावर यंदाच्या वर्षीचा दि.०२ ऑक्टोबर रोजी विजयी दसरा मेळाव्याचे आयोजन संदर्भात मागील पंधरा दिवसापासून तयारी जोरदार सुरू असून मैदान साफ सफाई करून स्टेज साऊंड सिस्टीम, रस्ते पार्किंग व्यवस्था नियोजनबध्द करण्यात येत आहे. यामुळे या ऐतिहासिक होणार्या दसरा मेळाव्याकडे बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे लक्ष केंद्रित होणार आह महाराष्ट्र राज्यात ठाकरे बंधू, पंकजाताई गोपीनाथराव मु ंडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा मेळावा त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दसरा होत असताना मागील वर्षापासून महाराष्ट्र राज्याची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायणगड संस्थान येथे २०२४ मध्ये ऐतिहासिक दसरा मेळावा मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे





संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील, मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या उपस्थितीत लाखो समाज बांधवांच्या साक्षीने रेकॉर्ड ब्रेक झाला. दरम्यान यंदाच्या वर्षी नारायणगडावर दसरा मेळाव्यासाठी घोषणा होवून संस्थान च्या वतीने आणि स्वयंसेवक भाविक भक्तांच्या वतीने जोरदार तयारी करण्यात येत आहे.

### दुसरा मेळाव्याचा खर्च निधी शेतकऱ्यांना मदतीसाठीठाव - महंत शिवाजी बाबा

एकीकडे नारायणपूर दुसरा मेळाव्याची तयारी जोरात असताना दुसरीकडे अतिवृष्टीमुळे बकवाळाजा संकटकाळ साजरा असून सर्व शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान झाले आहे. तेवी नारायणपूर महापूर येथून कांगाळवाडीपर्यंत पाणीच घरून गेल्याने एक प्रकारे संकटाच्या ओल्या ढुक्यांमध्ये संकुचन झालेल आहे. यामुळे शेतकऱ्यांना आधार मिळाला म्हणुन नारायणपूर संस्थान चे महंतश्री महंत शिवाजी महाराजांनी दुसरा मेळावा होणार खर्च निधी शेतकऱ्यांना मदतीसाठी ठेवणार असल्याचे आवाहन करून शेतकऱ्यांचे अमूळ पुरणासारखे मदत करावी असे सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३० सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## रक्त तपासण्यापूर्वी काय गोष्टींची काळजी घ्यावी चला जाणून घ्या...



रक्त तपासणी ही एक सोपी आणि आवश्यक चाचणी आहे. हे घरी बसून सहजपणे केले जाऊ शकते. रक्ताचा नमुना घेतल्यानंतर ही चाचणी प्रयोगशाळेत केली जाते. तपासणीत शरीरात कोणत्याही प्रकारचा रोग, संसर्ग आढळतो. रक्त तपासणीचा अहवाल एका दिवसात येतो. म्हणूनच याला सोपी चाचणी म्हणतात. परंतु रक्त तपासणी करण्यापूर्वी बर्‍याच गोष्टींची काळजी घेणे महत्वाचे आहे, ज्याची प्रत्येकाला माहिती नसते. या लेखात, आम्ही आपल्याला रक्त तपासणीपूर्वी लक्षात ठेवल्या पाहिजेत अशा काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत. रक्ताची तपासणी करून, शरीरातील अनुवांशिक रोगाबद्दल देखील जाणून घेता येते. रक्ताची कमतरता, रक्तातील कोणत्याही प्रकारचा संसर्ग, रक्तातील ग्लुकोजची तपासणी, लाल आणि पांढऱ्या रक्तपेशींचे प्रमाण, प्लेटलेटची संख्या आणि प्लाझ्मा इत्यादी शोधण्यासाठी रक्त तपासणी केली जाते. रक्त चाचणीपूर्वी काही विशेष गोष्टींची काळजी घेणे महत्वाचे आहे कारण जर खबरदारी घेतली गेली नाही तर अहवाल चुकीचे असू शकतात आणि डॉक्टरांना योग्य निदान करण्यात त्रास होऊ शकतो. तज्ञांच्या मते, शुगर टेस्ट, लिपिड प्रोफाइल टेस्ट किंवा थायरॉईड टेस्ट यासारख्या काही रक्त चाचण्या रिकाम्या पोटी केल्या पाहिजेत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, चाचणीपूर्वी म्हणजे चाचणीच्या 8 ते 12 तास आधी पाण्याशिवाय काहीही खाऊ नये. चहा, ज्यूस, कॉफी पिणे देखील चुकीचे नोंदवले जाऊ शकते.डॉक्टरांना औषधांबद्दल सांगा जर तुम्ही रक्त तपासणी करण्यापूर्वी कोणत्याही प्रकारची औषधे घेत असाल तर त्याबद्दल डॉक्टरांना आधी सांगा. रक्ताची तपासणी करण्यापूर्वी रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग इत्यादींसाठी औषधे घ्यायची की नाही याबद्दल डॉक्टरांना आधीच विचारा.

चाचणीपूर्वी व्यायाम करू नका जर आपली साखर किंवा कोलेस्टेरॉल जास्त असेल तर रक्त तपासणीपूर्वी जड व्यायाम करू नका किंवा चालू नका. असे केल्याने साखर किंवा कोलेस्टेरॉलचे परिणाम बदलू शकतात. म्हणून, रक्त तपासणीपूर्वी कमीतकमी 24 तास जड व्यायाम टाळला पाहिजे.पुरेशी झोप घ्या रक्त तपासणीपूर्वी झोप घेणे देखील महत्वाचे आहे. जर आपल्याला पुरेशी झोप मिळाली नाही तर आपल्या हार्मोन्स आणि साखरेच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हा अहवाल योग्य ठरणार नाही. रक्त तपासणीपूर्वी चांगले झोपण्याचा प्रयत्न करा. मद्यपान आणि धुम्रपानापासून दूर राहणे रक्त तपासणीपूर्वी कमीतकमी 24 तास अल्कोहोल किंवा धूम्रपान करू नका. विशेषत: यकृत कार्य, लिपिड प्रोफाइल आणि साखर चाचणीवर त्यांचा परिणाम होऊ शकतो.पाणी प्या पण जास्त पिऊ नका रक्त तपासणीपूर्वी हलके पाणी पिणे फायद्याचे आहे. त्यातून रक्त सहजपणे काढले जाऊ शकते . परंतु हे लक्षात ठेवा की जास्त पाणी पिण्यामुळे अहवालातही फरक पडू शकतो.

# गोकुंदा येथे स्त्री-रुग्णालयासह दोनशे खाटांचे रुग्णालय उभारण्यासाठी प्रयत्नशील-आ.भीमराव केराम

## गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात महाआरोग्य शिबिर संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : किनवट सारख्या अतिदुर्गम भागात केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्याच्या सुविधा जनमानसांपर्यंत पोहोचण्यासाठी मी प्रयत्नशील आहे.गोकुंद्यात स्त्री रुग्णालयासह २०० खाटांचे रुग्णालय उभारण्याचा मानस असून शासनाकडे या सर्व बाबींचा प्रस्ताव पाठवल्याचेही आ.केराम यांनी उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथील आरोग्य शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.केंद्र शासन व महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वस्थ नारी सशक्त परिवार या अभियानांतर्गत भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे दि.२९- सप्टेंबर रोजी सकाळी ठीक ११ वाजता आयोजित करण्यात आले होते. प्रारंभी आमदार भीमराव केराम, जिल्हा





शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.राजाभाऊ बुट्टे, वैद्यकीय अधीक्षक दत्ता केंद्रे रुग्ण कल्याण समितीचे सदस्य गंगणाजी नेम्मानिवार,अखिल खान, गोकुळ भवरे शिवसेनेचे तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे पत्रकार संघटनेचे तालुका सचिव बालाजी सिरसाट,परवीन शेख यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन आ.भीमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आले.शिबिराच्या सुरुवातीला उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांनी रुग्णालयाचा आराखडा प्रास्ताविकेतून सविस्तर मांडला.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके यांनी उपस्थित सर्व रुग्णांना आरोग्याच्या विषयी सखोल मार्गदर्शन करून गोकुंदा उपजिल्हा रुग्णालय येथे नवनवीन यंत्रसामग्रीसह आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यावर भर देऊ जिल्ह्यापासून दीडशे किलोमीटर दूर अंतर असूनही आमचं गोकुंदा मांडवी अन्य भागामध्ये विशेष लक्ष असून अधिकाधिक जोमाने आरोग्यसेवा पुरविण्याचे आश्वासित केले. या आरोग्य शिबिरात १२९२ रुग्णांच्या तपासण्या करण्यात आल्या.शिबिरात रक्तदाब,मधुमेह,दंतरोग, नेत्ररोग,स्तन व गर्भाशय रोग, मुख व कर्करोग तपासणी, तसेच गरोदर महिलांसाठी लसीकरण सेवा, रक्त तपासणी सेवा, क्षयरोग तपासणी, किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, मासिकपाळी स्वच्छता मार्गदर्शन, सिकलसेल आजार तपासणी, पोषण आहार मार्गदर्शन, मानसिक आरोग्य मार्गदर्शन, आयुष्मान कार्ड बनवणे,आभा कार्ड बनवणे, अवयव दान नोंदणी करणे, रक्तदान शिबिर व लहान बालकांची तपासणी विशेष तज्ञ डॉक्टर यांच्याकडून करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम कालिंदे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालयाचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी यांनी परिश्रम घेतले.

# ओला दुष्काळ मागणीसाठी संभाजी ब्रिगेडचे आंदोलन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : ओला दुष्काळ जाहीर करुन हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे या मागणीसाठी सरकारमधील भाजपचे वरिष्ठ नेते खा.अशोक चव्हाण यांच्या घरासमोर बोंबमारो आंदोलन करायला जाणार्या संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

संभाजी ब्रिगेड च्या वतीने राज्यभरात सत्तेत असलेल्या जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांच्या घरासमोर आंदोलन करून झोपीचे सोंग घेतलेल्या नेत्यांना





जागे करण्यासाठी सांगितले असता नांदेड येथे संभाजी ब्रिगेड चे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते खा.अशोक चव्हाण यांच्या घराकडे जात असताना पोलिसांनी ताब्यात घेतले व शिवाजी नगर पोलिस स्टेशन येथे घेऊन गेले यावेळी ओला दुष्काळ जाहीर झाला पाहिजे, हेक्टरी एक लाख रुपये अनुदान मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ संभाजी ब्रिगेड मैदानात या घोषणांनी परिसर दणाणुन गेला होता.यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, प्रदीप गुब्रे,इंजि प्रवीण जाधव, रूपेश पाटील,अंकुश कोल्हे, अविनाश शिंदे, मोहन शिंदे,नितीन कोकाटे, दिलीप दळवी,किरण बाबर, प्रभाकर राऊत,गणपत बोडके, संभाजी शेवाळे,राम कदम,कनिष्क खिलारे, विशाल कदम, साईनाथ शिंदे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

# मुंबई पोलिस ओंमप्रकाश दराडे यांचा पूरग्रस्तांसाठी आदर्शवत उपक्रम

मुंबई : राज्यातील अनेक भागात आलेल्या पूरस्थितीमुळे हजारो नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी समाजातील विविध घटक पुढे सरसावले आहेत. त्यातच मुंबई पोलिस दलातील ओंमप्रकाश दराडे यांनी आपल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत एक कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. दराडे यांनी आपल्या चार दिवसांच्या पगाराची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करून पूरग्रस्तांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या कार्यामुळे संकटाच्या काळात गरजूंच्या पाठीशी उभे राहण्याचा आदर्श निर्माण झाला आहे. दराडे म्हणाले, “पोलिस म्हणून आपण लोकांच्या सेवेसाठी असतो. पण संकटसमयी आर्थिक मदत करणे हीसुद्धा आपली जबाबदारी आहे. माझ्या या छोट्याशा योगदानामुळे जर कुणाला थोडा दिलासा मिळाला, तर त्यापेक्षा आनंदाची गोष्ट दुसरी नाही.” दराडे यांच्या या उपक्रमाचे समाजातील विविध स्तरांतून कौतुक होत आहे. पोलिस दलातील सहकारीसुद्धा त्यांच्या या कार्याचा अभिमान बाळगत आहेत. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी समाजातील इतर घटकांनीसुद्धा असेच पुढाकार घ्यावेत, असा संदेश त्यांच्या कार्यातून दिला जात आहे.

# धनगर समाजाचे सहकार मंत्र्यांच्या घरासमोर ढोल बजाओ आंदोलन

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा आरक्षणासाठी पाठिंबा

अहमदपूर प्रतिनिधीअहमदपूर/धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) आरक्षण मिळावे, या दीर्घकाळ प्रलंबित मागणीसाठी आज अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद येथील सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील यांच्या निवासस्थानी “ढोल बजाओ आंदोलन” करण्यात आले. अहमदपूर व चाकुर तालुक्यातील सकल धनगर समाज बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून सरकारकडे ठाम मागणी केली धनगर समाजाला एस.टी. आरक्षण मिळवून देण्यासाठी विधानसभेत ठोस भूमिका घेऊन तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी धनगर समाजातील कार्यकर्ते व ग्रामस्थांनी आज पारंपरिक पोशाखात, धनगरी ढोल



वाजवत मोठ्या उत्साहाने आंदोलन केले. सहकार मंत्र्यांचा पाठिंबाआंदोलनकर्त्यांच्या मागणीकडे सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील यांनी सकारात्मक दृष्टीकोन दाखवत धनगर समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. आरक्षणाचा मुद्दा विधानसभेत व सरकारपुढे गांभीर्याने मांडून न्याय मिळवून देण्यासाठी आपण स्वतः प्रयत्नशील राहू, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या आंदोलनात अहमदपूर व चाकुर तालुक्यातील सकल धनगर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. पांडुरंग लोकरे, हनुमंत देवकत्ते, डॉ. पांडुरंग टोम्पे, विठ्ठल तरडे, दयानंद सुरवसे, बळीराम भिगोले, शिवाजीराव खांडेकर, गंगाधर केराळे, सुरेश हाके, सुरेश शेवाळे, बालाजी पारेकर, विष्णु पोले, सुर्यकांत चिगळे, गणेश नरवटे, ॲड. सोमनाथ फुले, तानाजी वागलगावे, सतिष गाडेकर, रामरत्न पारके, बालाजी काच्छे, बाळासाहेब बेडदे, तुकाराम लोकरे, गणेश लोकरे, खंडु शेवाळे, ज्ञाणेश्वर बनसोडे,तुळसिराम काच्छे.काशिनाथ काच्छे. ज्ञाणेश्वर गाडेकर, किशण चिंचोळे, किष्णा नंदगावे, भानुदास वागलगावे, बालाजी मलीशे, नागनाथ सुरवसे, खंडु वागलगावे, पंडित चिंचोळे, आभंग चिंचोळे, डिगांबर म्हेत्रे, घनशाम हाके, कोडिबा खडके, काशिनाथ पाटील, बाबुराव वागलगावे, सोमनाथ वागलगावे, गोविंद माडुरके, जनार्धन माडुरके, ज्ञानेश्वर सुरवसे, शिवाजी पाटील, गणेश आवराळे, शिवराज खेळके, आकाश वागलगावे, प्रकाश पाटील, धनाजी मलशे, व्यंकट वागलगावे, सुकदेव ऐरनाळे, चंद्रकांत नेवाळे, पप्पु कांबळे, गिरीधर पाटील, अंबादास केळके, बबरु नेवाळे, व्यंकट हाके, आबा भिके आदींसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. या आंदोलनातून धनगर समाजाने पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला की, आरक्षणाच्या मागणीवर तातडीने तोडगा काढावा. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन पेटेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३० सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## कर्ज घेऊन कार खरेदी करणार असाल तर आधी 'या' गोष्टी लक्षात ठेवा



तुम्ही कार खरेदी करणार असाल तर आधी ही बातमी वाचा. तुम्हीही या दिवाळीत कार लोन घेऊन कार खरेदी करण्याचा विचार करत असाल तर सर्वात आधी तुम्हाला कार लोनशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टींबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. आज आम्ही तुम्हाला याबद्दल सांगणार आहोत. जाणून घेऊया.

प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असते की त्याने स्वतःची कार खरेदी करावी, पण सर्वसामान्य माणसासाठी स्वतःची कार खरेदी करणे ही खूप मोठी गोष्ट आहे. गाडी खरेदी करण्यासाठी लाखो रुपयांची गरज असते, ही सामान्य माणसासाठी खूप मोठी रक्कम आहे. आजकाल बहुतेक लोक बँकेकडून कारचे कर्ज घेऊन स्वत: ची कार घेण्याचे स्वप्न पूर्ण करत आहेत. जर तुम्हीही या दिवाळीत कार लोन घेऊन कार खरेदी करण्याचा विचार करत असाल तर सर्वात आधी तुम्हाला कार लोनशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टींबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. आज आम्ही तुम्हाला याबद्दल सांगणार आहोत. चला जाणून घेऊया. जास्त डाउन पेमेंट कराकार कर्ज घेण्यापूर्वी जास्तीत जास्त डाउन पेमेंट करा. अधिक डाउन पेमेंट केल्यास, आपल्या कर्जाची रक्कम कमी होईल, ज्याचा थेट परिणाम व्याज रक्कम आणि मासिक ईएमआयवर होईल. कारच्या किंमतीच्या 20 टक्क्यांपर्यंत डाउन पेमेंट करा. जर तुम्ही 10 लाख रुपयांची कार खरेदी करत असाल तर 2 लाख रुपयांचे डाउन पेमेंट करा.

कमी मुदतीसह बजेट ईएमआय

आपल्या कार कर्जाचा कालावधी 4 वर्षांपेक्षा जास्त ठेवू नका आणि कर्जाचा कालावधी कमी ठेवण्याचा प्रयत्न करा. कमी कालावधी असल्यास तुमची व्याजाची रक्कमही कमी होईल. तसेच, तुमचा मासिक ईएमआय तुमच्या मासिक पगाराच्या 10 टक्क्यांपेक्षा जास्त नसावा. मासिक ईएमआय आणि कालावधी दरम्यान शिल्लक ठेवा, म्हणजेच, जर तुमचा मासिक ईएमआय जास्त होत असेल, जो तुम्ही भरण्यास सक्षम नाही, तर तुम्ही कालावधी वाढवू शकता.

विविध कर्ज ऑफरची तुलना

कार कर्ज घेण्यापूर्वी फक्त एका ऑफरकडे पाहू नका. वेगवेगळ्या बँक ऑफरमध्ये तुलना करा. तसेच, काही एनबीएफसी कार कर्जाचे व्याज दर पहा. सर्वांची तुलना करा आणि स्वत: साठी सर्वोत्तम ऑफर निवडा.

कारचे बजेट सुज्ञपणे ठरवा

तुम्ही कर्ज घेऊन कार खरेदी करत आहात याचा अर्थ असा नाही की तुम्ही महागडी कार खरेदी करता. आपले बजेट पहा आणि कारची किंमत ठरवा. त्याचबरोबर ऑफर्स आणि डिस्काऊंटच्या बाबतीतही महागड्या कार खरेदी करू नका. महागड्या कारची देखभाल देखील जास्त आहे, जी आपले मासिक बजेट पूर्णपणे हलवू शकते.

# डिजिटल बँकिंगकडे वाटचाल – द्वारकादास मंत्री बँकेच्या सभेत अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांची घोषणा

## डॉ.आदित्य सारडा यांच्या प्रयत्नांतून द्वारकादास मंत्री बँक सक्षम





बीड | प्रतिनिधी रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेचा CRAR ९ टक्के असल्यास बँक सक्षम असल्याचे मानले जाते मात्र द्वारकादास मंत्री बँकेचा CRAR हा ६६.१५ टक्के आहे. बँकेचे नेट वर्थ हे कमीत कमी २ कोटी पाहिजे परंतु बँकेचे नेटवर्थ हे २४ कोटीच्या वर असल्यामुळे बँक आर्थिक दृष्ट्या सक्षम असून लवकरच ग्राहकांना डिजिटल बँकिंग सुविधा देण्यासाठी बँकेकडून कार्यवाही सुरू असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी दिली. व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची ६३ वी वार्षिक सर्व साधारण रविवार २८ सप्टेंबर रोजी बीड शहरातील बालाजी मंदिर सभागृहामध्ये संपन्न झाली. यावेळी डॉ. आदित्य सारडा बोलत होते.

सभेला उपाध्यक्ष शुभम चितलांगे, सि.ए.गिरीश गिल्डा, डॉ.आदिती सारडा, अंजली पाटील, डॉ.राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख मोहम्मद सलीम, प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, राम गायकवाड, सतीश धारकर प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन शफियोद्दिन, माजी मुख्यकार्यकारी अधिकारी राधेश्याम सोनी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, कठीण काळात बँकेच्या कर्मचारी व संचालक मंडळानी बँकेची धुरा नीट चालवल्यामुळे बँक रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक निर्बधातून पूर्णतः मुक्त झाली. रिझर्व्ह बँकेचे सर्व आर्थिक नियम बँकेने पाळलेले. या सर्व गोष्टीचा परिपाक म्हणून चालू आहवाल वर्षात ऑडीटरने बँकेस ऑडीट वर्ग 'अ' दिलेला आहे. वर्षाअखेर बँकेचे वसूल भाग भांडवल २० कोटीच्या वर असुन बँकेचा एकूण निधी ९२ कोटीच्या वर आहे. त्यामध्ये बँकेचा राखीव निधी १५ कोटी २८ लाख, बुडीत व संशयित निधी ५३ कोटी ५५ लाख, ईमारत निधी २ कोटी ७१ लाख, गुंतवणूक चढउतार निधी १७ लाखाच्या वर बँकेकडे उपलब्ध आहे. बँकेच्या एकूण ठेवी ६३ कोटी च्या वर असून एकूण कर्जे ७९ कोटी ८२ लाख आहे. बँकेची ईतर बँकेतील शिल्लक, रोख शिल्लक व शासकीय रोख्यातील व ईतर बँकेतील गुंतवणूक ८१ कोटी २४ लाख असून त्यामध्ये शासकीय रोख्यातील गुंतवणूक ६० कोटी ११ लाख आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे शासकीय रोख्यामध्ये NDTL च्या १८ टक्के गुंतवणूक करावी लागते परंतु बँकेनी केलेली गुंतवणूक ही ९४ टक्के पेक्षा जास्त आहे. यातून ही बँकेची आर्थिक स्थिती किती सक्षम आहे हे सिद्ध होते. बँकेचे निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.४२ असून बँकेच्या २० शाखा कार्यरत आहेत. वसुलीचे उत्कृष्ट उदिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याचा बक्षीस देऊन गोरव करण्यात आला. सुत्रसंचलन राधेश्याम सोनी यांनी तर आभार संचालक संतोष लहाने यांनी मानले.

भक्कम आर्थिक सामर्थ्य असलेले मंत्री बँक

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ९ टक्के CRAR असला तरी द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचा CRAR तब्बल ६६.१५ टक्के इतका आहे. तसेच नेटवर्थ किमान २ कोटींचे असणे अपेक्षितअसताना बँकेचे नेटवर्थ तब्बल २४ कोटींच्या वर आहे. मार्च २०२५ पर्यंत काटेकोर वसुलीमुळे बँकेचा नेट NPA शून्य टक्के झाला असून ऑडिट अहवालात बँकेस 'अ' वर्ग प्रदान करण्यात आला आहे. या बद्दल अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी सर्व संचालकांचे अभिनंदन केले.

मंत्री बँकेला गुंतवणूक आणि ठेवींची मजबुती

वर्षाअखेर बँकेचे एकूण निधी ९२ कोटींच्या वर असून त्यात राखीव निधी १५.२८ कोटी, बुडीत व संशयित निधी ५३.५५ कोटी, तर इमारत निधी २.७१ कोटी इतका आहे. बँकेच्या एकूण ठेवी ६३ कोटींच्या वर असून कर्जवाटप ७९.८२ कोटी इतके आहे. याशिवाय इतर बँकांमधील शिल्लक व शासकीय रोख्यातील गुंतवणूक ८१.२४ कोटी आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार NDTL पैकी १८% गुंतवणूक करणे बंधनकारक असताना द्वारकादास मंत्री बँकेने तब्बल ९४ टक्के गुंतवणूक शासकीय रोख्यात केली आहे. त्यामुळे मंत्री बँकेला गुंतवणूक आणि ठेवींची मजबुती मिळाली आहे.

मंत्री बँकेच्या या आहेत महत्वाच्या योजना

बुलेट सोने तारण कर्ज योजना, सुलभ पगार तारण कर्ज योजना, छोट्या व मध्यम व्यवसायासाठी कर्ज पुरवठा, वाहतूक कर्ज, बांधकाम कर्ज व व्यापारी कर्ज अशा विविध योजनेमार्फत कर्ज वाटप करण्यात येत आहे याच बरोबर, ग्राहकांसाठी लवकरच डिजिटल बँकिंग सुविधा उपलब्ध होणारा आहे. या शिवाय अन्य काही महत्वाच्या योजना मंत्री बँक ग्राहकांना उपलब्ध करून देत आहे.

# विचाराचं सोनं लुटण्यासाठी भगवान भक्ती गडावर लाखोच्या संख्येने उपस्थित रहा - नवनाथ शिराळे

## मुंडे साहेबांवर प्रेम असणाऱ्या जनतेने मोठ्या प्रमाणात भगवान भक्ती गडावर उपस्थित राहावे





**यावेळी उपस्थित सलीम जहांगीर अजय सवय शांतिनाथ डोरले बाबुराव परळकर देविदास नागरगोजे सर गणेश लांडे गिरी साहेब ननवरे साहेब डॉक्टर अभय वनवे मीराबाई गांधले संध्या राजपूत जयश्री मुंडे प्रीत कुकडेच्या सौ देशपांडे ताई नागरगोजे साहेब संभाजी सुर्वे गवळी साहेब इरशाद भाई इत्यादी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते**

बीड: महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री माननीय नामदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भगवान भक्ती गडावर संपन्न होणाऱ्या दसरा मेळाव्यात विचाराचे सोनं लुटण्यासाठी जिल्ह्यातील भगवानबाबावर श्रद्धा असणाऱ्या व पंकजाताई मुंडे साहेबांवर प्रेम असणाऱ्या जनतेने मोठ्या प्रमाणात भगवान भक्ती गडावर उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष आव्हान नवनाथ शिराळे यांनी केले आहे. बीड शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने अशोक लोढा यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत बोलत असताना नवनाथ शिराळे यांनी असे आवाहन केले आहे. दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी आयोजित केलेल्या बैठकीसाठी भाजपचे ज्येष्ठ नेते देविदास नागरगोजे सलीम जहांगीर मीराताई गांजले गणेश लांडे अजय सवाई जयश्रीताई मुंडे शांतिनाथ डोरले डॉ. अभय वनवे विजय चौधरी संध्याकाळी राजपूत प्रीत कुकडेच्या इत्यादी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी देविदास नागरगोजे, अशोक लोढा, अजय सवयी, सलीम जहांगीर, इरशाद शेख यांनी बैठकीस मार्गदर्शन केले . बैठकीत पुढे बोलताना नवनाथ शिराळे असे म्हणाले की भगवान भक्ती गडावरील दसरा मेळावा हा 18 पगड जातीचा दसरा मेळावा असून मुंडे साहेबांनी सुरू केलेली ही परंपरा पंकजाताई च्या रूपाने जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील जनतेला संघर्ष करण्याची प्रेरणा देत असून या मेळाव्याच्या माध्यमातून विचाराचा सोनं लुटलं जातं तेव्हा बीड जिल्ह्यातील तमाम जनतेने मोठ्या प्रमाणात या दसरा मेळाव्यात सहभागी होऊन भगवान बाबांचे आशीर्वाद घ्यावेत अशा प्रकारचे आव्हान भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे सोबत यावेळी उपस्थित सलीम जहांगीर अजय सवय शांतिनाथ डोरले बाबुराव परळकर देविदास नागरगोजे सर गणेश लांडे गिरी साहेब ननवरे साहेब डॉक्टर अभय वनवे मीराबाई गांधले संध्या राजपूत जयश्री मुंडे प्रीत कुकडेच्या सौ देशपांडे ताई नागरगोजे साहेब संभाजी सुर्वे गवळी साहेब इरशाद भाई इत्यादी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

# बैलाला साखळी घालतो तसं... सोन्याची चैन घालून मिरवणाऱ्यांना अजित दादांचा टोला

**अजित पवारांच्या हस्ते पुण्यातील चाकण येथे रांका ज्वेलर्सच्या दालनाचे उद्घाटन पार पडले. यावेळी अजित पवार यांनी सोन्याची चैन गळ्यात घालून फिरणाऱ्यांना टोला लगावला आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या मिश्किल वक्तव्यासाठी ओळखले जातात. आज अजित पवारांच्या हस्ते पुण्यातील चाकण येथे रांका ज्वेलर्सच्या दालनाचे उद्घाटन पार पडले. यावेळी अजित पवार यांनी सोन्याची चैन गळ्यात घालून फिरणाऱ्यांना टोला लगावला आहे. सोनं हे पुरुषांना नाही तर स्त्रियांना शोभून दिसतं असं म्हणत अजित पवारांनी सोन्याची चैन घालणाऱ्या पुरूषांची बैलाशी केली आहे. अजित पवार नेमकं काय म्हणाले ते सविस्तर जाणून घेऊयात. अजित पवार यांनी आपल्या भाषणात म्हटलं की, गोल्डन मॅन म्हणून काहींची ओळख आहे. 'काहींनी तर सोन्याचे कपडे शिवले होते. हे अति होत आहे. माझं पुरुष मंडळींना आणि तरुणांना एकच सांगणं आहे की, सोनं हे आपल्या मातेच्या, पत्नीच्या, बहिणीच्या आणि मुलीच्या अंगावरच शोभून दिसतं. ते पुरुषांच्या अंगावर नाही. त्यामुळे पुरुषांनी नको त्या भानगडीत पडू नका.' पुढे बोलताना अजित पवारांनी सोनं घालणाऱ्या पुरुषांना म्हटले की, 'उगाचच बैलाच्या गळ्यात जशी साखळी घालतो, तशी सोन्याची साखळ्या घालतात आणि समोर येतात. खर तर हे सगळं ते त्यांच्या पैशाने करतात. मला यावर काही बोलण्याचा अधिकार नाही.' अजित दादांच्या या विधानानंतर उपस्थितांमध्ये हशा पिकला होता. महाराष्टात पुराचे संकट आहे. शेतकऱ्यांना मदतीची गरज आहे. याबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, पंतप्रधान, अमित शाह यांना विनंती करून मदतीसाठी निवेदन दिलं आहे. विविध डिपार्टमेंटची मदत लागत आहे. अजून काही गोष्टी समोर येतील आणि निर्णय घेतले जातील. दिवाळीपर्यंत मदत करण्याचं आमचं नियोजन आहे. मंत्रिमंडळ बैठकीत उद्या सकारात्मक निर्णय होतील.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३० सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# राज्यावर संकट, भारतीय हवामान विभागाचा मोठा इशारा, या जिल्ह्यात पुढील 24 तास रेड अलर्ट

राज्यात मोठी अतिवृष्टी झाल्याने नुकसान झाले. सध्या पंचनामे सुरू असून संकट अजूनही टळले नाही. प्रशासन अलर्ट मोडवर बघायला मिळतंय. राज्यावरील कमी दाबाचा पट्टा आता कमी होताना दिसतोय. मात्र, आजही काही भागात भारतीय हवामान विभागाने अलर्ट जारी केलाय. नांदेड जिल्हात विजांच्या कडकडटासह पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला. मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, सोलापूर, सांगली, छत्रपती संभाजीनगरमध्ये ढगाळ वातावरणाची शक्यता आहे. जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सध्या सुरू आहे. यामुळे नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय. यासोबतच नागरिकांचे स्थलांतर करण्यात आलंय. अंबड आणि घनसावंगी तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीकाठच्या गावात पाणी शिरले. खबरदारी म्हणून दोन दिवसापूर्वीच जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांचे स्थलांतर, शाळा आणि समाज मंदिरात केले स्थलांतर केले. गोदाकाठच्या नागरिकांना प्रशासनाने अगोदरच सतर्कतेचा इशारा दिलाय. सातत्याने पडणारा पाऊस आणि जायकवाडी प्रकल्पातून सोडण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणात पाण्यामुळे गोदावरी नदी सध्या मोठ्या प्रमाणात दुथडी भरून वाहत असून नदीकाठच्या गावांमध्ये पाणी शिरलं. जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांचे स्थलांतर



ठाणे जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीत 27 बळी गेले जखमीचा आकडा 21 वर पोहोचला असून कल्याणमध्ये सर्वाधिक मृत्यू झाल्याची नोंद आहे. 27 सप्टेंबरपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ठाणे जिल्ह्याला रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. मे महिन्यापासून आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीमुळे तब्बल 27 जणांचा मृत्यू झाला, तर जखमींची संख्या 21 वर आहे. यात अतिवृष्टीमुळे सर्वाधिक 11 बळी कल्याण तालुक्यात गेले, त्यापाठोपाठ शहापूरमध्ये 8 आणि मुरबाडमध्ये 4 मृत्यूंची नोंद.

ठाणे जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीत 27 बळी ठाणे, भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याणसह अनेक भागांत सखल वस्त्यांमध्ये पाणी शिरले, नागरिकांचे स्थलांतर करण्याची वेळ. महामार्गासह शहरातील अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेल्याने रस्ते वाहतूक ठप्प; रेल्वे रुळांवर पाणी साचल्यामुळे रेल्वे सेवेवरही परिणाम. रविवारी सकाळपासून सोमवारी सकाळपर्यंत ठाणे जिल्ह्यात 84.1 मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

# अतिवृष्टीमुळे शेतकरी मेटाकुटीला तर बँकांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक शेतकऱ्यांच्या बँक खात्याला लावलेले तात्काळ होल्ड काढा – बदाम पौळ

गेवराई :सर्वत्र अतिवृष्टी होवून झालेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून यामुळे हजारो हेक्टरांवरील शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान होवून पिके नष्ट झाली आहेत. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. तरी शासनाने ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये आर्थिक मदत देवून शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी तसेच राष्ट्रीयकृत बँकांनी पीक कर्ज वसुलीच्या नावाखाली शेतकऱ्यांचे बचत खाते होल्ड केले आहेत. तरी बँक खात्याला लावलेले होल्ड तात्काळ काढावेत अशी मागणी सुशी येथील युवानेते बदाम पौळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



गेवराई तालुक्यातील जातेगाव, पाचेगाव, सिरसदेवी, धोंडराई, तलवाडा, उमापूर, मादळमोही, चकलंबा या मंडळात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला असून अतिवृष्टी होवुन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाने अक्षरशः कहरच केला आहे. यामुळे हजारो हेक्टरांवरील शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान होवून पिके उध्वस्त झाली आहेत. यात अनेक शेतकऱ्यांची पिकेच नव्हे तर मातीसह वाहून गेल्याने शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास गेल्या आठ–दहा दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीने हिरावून घेतला आहे. यामुळे शेतकऱ्याची झालेली गुंतवणूक पूर्णपणे वाया गेली असून बियाणे, खत, कीडनाशके यासाठी केलेला खर्च मातीमोल झाला आहे. एकीकडे कर्जाचा डोंगर तर दुसरीकडे हाती काहीही उत्पन्न न उरण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढवली आहे. या परिस्थितीत शेतकरी पूर्णपणे संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करुन बँक खात्याला लावलेले होल्ड तात्काळ काढण्यात यावे तसेच शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत द्यावी अशी मागणी युवा नेते बदाम पौळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन बीड तालुक्यातील मराठा सेवकांनी गावोगावी पूरग्रस्त नागरिकांना किराणा किट वाटप केली.मराठा सेवक किरण भगत पाटील यांच्या माध्यमातून हि मदत देण्यात आली सोबत मराठा सेवक राहुल कवठेकर भरत काशिद शशिकांत काशिद श्रीराम काशिद दत्ता देवकर गोकुळ मस्के.

# लक्ष्मण बिडवे यांनी घेतली मंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांची भेट,



बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी

बीड जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसापासून मुसळधार पावसाने थैमान घातला आहे, याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण विठ्ठल राव बिडवे या सामाजिक कार्यकर्त्यांनी राज्याच्या मंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांची भेट घेतली व शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देण्यात यावी अशी मागणी बिडवे यांनी केली आहे, बीड जिल्ह्यातील गोदा–वरी नदीला महापूर आला असता रामपुरी, पांढरवाडी,देशमुख वाडी, श्रीपत आंतरवाला, गोपत पिंपळ–गाव, मनुबाई जवळा, ढाले–गाव, या भागातील सर्व शेतकरी बांधवांना भीतीच वातावरण निर्माण झाला असता पुणे येथे महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांची भेट घेतली व सर्व शेतकऱ्यांची भावना मांडली,

# बीड़ शहरातील प्रभाग क्र १७ मधील कचरा घंटा गाडी चालू करा। नगर परिषद ला बीड़ शहर कॉंग्रेस कमेटी ची मागनी।

बीड़ प्रतिनिधीः बीड़ शहरातील प्रभाग १७ मधील कचरा घंटा गाडी चालु करा अशी मागनी बीड़ शहर कॉंग्रेस कमेटी चे महासचिव तथा ओबीसी कॉंग्रेस बीड़ शहर अध्यक्ष सय्यद फरहान यांनी नगर परिषद चे मुख्यधिकारी साहेबाला निवेदन देऊन केली आहे.निवेदन मधे म्हटले आहे की बीड़ शहरातील प्रभाग १७ मधील खंदक रोड़,कीला रोड़,मीलीया कालेज रोड़,जामा मस्जीद रोड़,कीला कमान हरनवल गल्ली,काली मस्जीद व नूरी मस्जीद रोड़ व अजीज पुरा भागात,कचरा घंटा गाडी येत नसल्या मुळे रास्ता वर जागो जागी कचरा चे ढिकारे पड़ले आहे व घानी चे सम्राज्य पसरत आहे व दुर्गंदी वाढत आहे व लोकाच्या आरोग्या ला धोका निर्मान होऊ शकतो त्या मुळे दररोज कचरा घंटा गाडी चालु करण्यात यावी अशी मागनी बीड़ शहर कॉंग्रेस कमेटी चे अध्यक्ष परवेज भाई कुरेशी यांच्या मार्गदर्षना खाली निवेदन देताना बीड़ शहर उपाध्यक्ष मीलींद मस्के ,काजी मुहीब रहेमान,शहर महासचिव सय्यद फरहान,शहर कोषाध्यक्ष आमेर पाशा ,यशवंत मचाले सर यांनी केली आहे।



# महाविद्यालयीन जीवनातच स्वत:ची ओळख निर्माण करा – ऍड. रुक्मीण बागल

माजलगाव प्रतिनिधी दिनांक 29/09/2025 महाविद्यालयीन जीवनातच स्वतःची ओळख निर्माण करायला हवी असे प्रतिपादन माजलगाव येथील प्रसिद्ध विधीज्ञ ऍड. रुक्मीण बागल यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव अंतर्गत तक्रार निवारण समिती व सखी सावित्री समिती यांच्यावतीने नवरात्र निमित्त महाविद्यालयात “दिवस तुझे हे फुलायचे” या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी माजलगाव येथील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. प्रज्ञा जोशी तसेच मंचावर अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. प्रेमनंदा घडसिंग, सखी सावित्री मंचच्या प्रमुख प्रा. सुवर्णा पांचाळ उपस्थित होत्या.




पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आजच्या काळात शिक्षण व करिअरवर आपण जास्त लक्ष देण्याची गरज आहे आजचा जमाना हा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए. आय.) चा आहे. ज्ञान हे आपल्या दारामध्ये येऊन उभा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मग त्याचा सदुपयोग करायचा की दुरुपयोग करायचा हे आपणच ठरवले पाहिजे. या काळामध्ये आपण योग्य ती खबरदारी व निर्णय घेतले तर भविष्यात आपण नक्कीच यश संपादन करू. महाविद्यालयीन जीवनातच करिअरची योग्य निवड केली तर भविष्यात पश्चाताप करण्याची गरज भासणार नाही. आजचा विद्यार्थी हा सोशल मीडियावर जास्त गुरफटका चालला आहे. त्याचा दिवसातील बराचसा वेळ हा सोशल मीडियावर जात आहे. यातून योग्य ते ज्ञान जरूर घेता येते पण तसे विद्यार्थी करताना दिसून येत नाहीत. यामुळे त्यांचा जास्त वेळ वाया जातो परिणामी करिअरची निवड करताना त्यांना या गोष्टीचा भविष्यात त्रास होऊ शकतो म्हणून हीच योग्य अशी वेळ आहे याचा सदुपयोग आपण नक्कीच करावा असे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोप करताना माजलगाव येथील प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. प्रज्ञा जोशी म्हणाल्या की, नवरात्र उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक अद्वितीय असा सण आहे. या काळामध्ये नऊ दिवस देवीचे उपवास करून लोक देवीची मनोहर भावे प्रार्थना करतात. ज्यामधून आपणास आपली मानसिक व शारीरिक स्थिती संतुलित राखण्याचे काम केले जाते. नवरात्र उत्सव हा नऊ दिवसच का साजरा केला जातो याचे महत्त्व देखील त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितले. बिजांकुर उगवण्यास नऊ दिवस लागतात. स्त्रीच्या गर्भामध्ये नऊ महिने अर्भक वाढते. जग निर्मितीचे ब्रह्मरूप तिच्यात आहे. विष्णू हा तिचा पालन करता आहे. स्त्रीला बऱ्याच वेळा आपल्या जीवनात महिषासुरमर्दिनीसारखी आपली भूमिका पार पाडावी लागते. मानसिक व शारीरिक आरोग्याची जपवणूक आपणास या वयापासूनच करावयास हवी. आपली शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी ध्यानधारणा, मौन यासारखे मानसिक आरोग्य जपण्याचे व्यायाम आपण सतत केले पाहिजेत. घरातील वरिष्ठांचे आशीर्वाद घ्यावेत. जेणेकरून त्या आशीर्वादामधून आपणास बळ मिळेल व त्याचा सदुपयोग आपल्या

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com